## विशेष दिवाणी दावा क्रमांक ०१/२०१३ मधील निशाणी ६३ खालील आदेश

१. वादीने प्रस्तूतचा अर्ज सर्व प्रतिवादींच्या विरोधात दाखल केला आहे. वादीने अशा प्रकारे मागणी केली आहे की मयत प्रतिवादी क्रमांक ९ चे कायदेशिर वारसदारांची नांवे रेकॅार्डवर घेण्याची वादीला परवानगी देण्यात यावी.

२. प्रस्तूतच्या अर्जाची थोडक्यात वस्तूस्थिती अशा प्रकारे आहे की, वादी कथन करतात की प्रस्तूतच्या दाव्याचे न्याय चौकशीचे कामकाजाच्या पायरीला असतांना प्रतिवादी क्रमांक ९ शकिल हे दुर्देवीरित्या तारीख ३०.०२.२०१७ रोजी मरण पावले आहे. आणि नियोजित पक्षकार ९-अ ते ९-ह हे सर्व मयत प्रतिवादी क्रमांक ९ चे कायदेशिर वारसदार आहे. आणि म्हणून प्रस्तूतचा दावा प्रतिवादी क्रमांक ९ चे मृत्यु पश्चात कायदेशिर वारसदारां मार्फत चालविण्याचा हक्क मयत प्रतिवादी क्रमांक ९ चे कायदेशिर वारसदार ९-अ ते ९-ह जे कायदेशिर वारसदार म्हणून दप्तरी सदरी घेण्याची आवश्यकता आहे. वादीने मागणी केली आहे की प्रस्तूतच्या अर्जामधील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद केलेले मयत प्रतिवादी क्रमांक ९ चे वारसदारांची नांव वारसदार ९-अ ते ९-ह रेकॅार्डवर घेण्याची परवानगी वादीला देण्यात यावी. वादीने विनंती केली आहे की प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात यावा. म्हणून प्रस्तूतचा अर्ज.

३. प्रस्तूतच्या अर्जाच्या वस्तूतस्थितीचे अवलोकन सर्व प्रतिवादींनी मयत प्रतिवादी क्रमांक ९ चे वारसदारांची नांवे प्रस्तूतच्या दाव्याकामी रेकॅार्डवर घेण्यास नाहरकत घेतली आहे. वादीच्या विद्वान वकीलांनी भर दिलेले दस्त ऐवजी पुरावा मृत्युचे प्रमाणपत्राचे अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होते की, प्रतिवादी क्रमांक ९ शकिल हे तारीख ३०.०२.२०१७ रोजी मरण पावले आहे. आणि त्यांच्या मृत्यु पश्चात मयत प्रतिवादी क्रमांक ९ चे वारसदारांनी त्यांचे नांवे दप्तरी सदरी घेण्यास दाखल केलेला प्रस्तूतचा अर्ज हा मुदतीच्या कालावधीत आहे हे वादीच्या विद्वान वकीलांनी सिध्द केले आहे. आणि तसेच

सर्व प्रतिवादींनी मयत प्रतिवादी क्रमांक ९ चे वारसदार ९-अ ते ९-ह ची नांवे रेकॉर्डवर घेण्यास नाहरकत घेतली असल्याने असा निष्कर्ष कारण्यास काहीच हरकत नाही की मयत प्रतिवादी क्रमांक ९ चे वारसदांची नांवे ९-अ ते ९-ह रेकॉर्डवर घेण्यास वादी पात्र बनतात. कारण प्रस्तूतचा अर्ज हा मुदतीच्या कालावधीत वादीने दाखल केलेला आहे. त्या अनुषंगाने असा निष्कर्ष काढण्यास काहीच हरकत नाही की वादीने मागणी केलेली दाद की मयत प्रतिवादी क्रमांक ९ चे वारसदार ९-अ ते ९-ह ची नांवे रेकॉर्डवर आणण्यास वादीला परवानगी देण्यात यावी, ही दाद मंजूर होण्यास पात्र आहे. मी या निष्कर्षास पोहचली आहे की प्रस्तूतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब उत्तरास मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर.

२. वादीला मयत प्रतिवादी क्रमांक ९ चे वारसदारांची नांवे रेकॉर्डवर आणण्याची परवानगी देण्यात आली आहे.

३. खर्चा संबंधी आदेश नाही.

स्वाक्षरीत/-

( वै.म. गोतसुर्वे )

दिनांक : ०७-१२-२०१७ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

वैजापूर.

<u>CERTIFICATE</u>

I am affirm that the contents of this P.D.F., file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | Yogesh H. Gajbhiye |
| Court | :- | Jt. Civil Judge (S.D.) Vaijapur. |
| Date | :- | 07.12.2017 |
| Order signed by the presiding officer on | :- | 07.12.2017 |
| Order uploaded on | :- | 18.01.2018 |